REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# ग्रेस यांच्या कवितेतील निसर्गसंवेदन

डॉ. कविता मुरुमकर

**प्रस्तावना :**

ग्रेस हे मर्ढेकरोत्तर कालखंडातील आणि नवकवितेच्या प्रांतातील एक संवेदनशील कवी होय. मर्ढेकरोत्तर नवकवीच्या दुसऱ्या पिढीतील एक महत्वाचे कवी म्हणून त्यांची गणना होते. माणिक सीताराम गोडघाटे उर्फ ग्रेस यांनी मराठी साहित्यविश्वात मोलाचे योगदान दिले. त्यांचे पाच काव्यसंग्रह आणि सात ललित लेख प्रकाशित झाले आहेत. 'वाऱ्याने हालते रान' या त्यांच्या ललित लेखसंग्रहासाठी त्यांना 2012 सालचा साहित्य अकादमी पुरस्कार देण्यात आला. 'संध्याकाळच्या कविता', 'चंद्रमाधवीचे प्रदेश', 'सांध्यपर्वातील वैष्णवी', 'राजपुत्र आणि डार्लिंग', 'सांजभयाच्या साजणी', 'बाई!'जोगिया पुरुष' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. 'चर्चबेल', 'मितवा', 'वाऱ्याने हालते रान', 'ओल्या वेळुची बासरी', 'मृगजळाचे बांधाकाम', 'संध्यामग्न पुरुषाची लक्षणे', 'कावळे उडाले स्वामी' हे त्यांचे ललितलेख संग्रह आहेत. 'संध्याकाळच्या कविता' या त्यांच्या काव्यसंग्रहास महाराष्ट्र शासनाचे कवी केशवसुत पारितोषिक मिळाले. जी.ए.कुलकर्णी सन्मान पुरस्कार, जीवनवृत्ती पुरस्कार, दमाणी पुरस्कार, नागभूषण पुरस्कार, मारवाडी पुरस्कार, चार वेळा महाराष्ट्र शासन उत्कृष्ट वाङ्‌मयनिर्मित पुरस्कार मिळाले. ग्रेस हे इ.स.2012 साली झालेल्या दुसऱ्या ई–साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. 'युगवाणी' व 'संदर्भ' या वाङ्‌मयीन चळवळीचे नेतृत्व ग्रेस यांनी केले. साहित्य अकादमी, विश्वकोश या समित्यांवरही त्यांनी काम केले.

ग्रेस यांच्या कवितेतील निसर्ग चित्रणे विपुल आहेत. निसर्ग हा ग्रेस यांच्या भावजीवनाचा भाग आहे. आकाश, क्षितिज, संध्याकाळ, सूर्य, चंद्र, वारा, समुद्र, झाडे इ. निसर्गातले घटक त्यांच्या कवितेत येतात. कावळे, चिमण्या, घार, मोर हे पक्षी, मोगरा, गुलाब,कमळ, बकूळ, चाफा ही फुले, चाफा बाभूळ हे वृक्ष, घोडे, हरीण हे प्राणी ग्रेसच्या कवितेत येतात.

**'ती गेली तेव्हा रिमझिम**
**पाऊस निनादत होता**
**मेघात मिसळली किरणे**
**हा सूर्य सोडवित होता...'**

कवितेच्या या चार पंक्तीत पाऊस, मेघ, किरणे, सुर्य या निसर्ग प्रतिमा एकवटून जातात.

**'पारावर बसल्या बाई**
**की धनी हंबरे रानी**
**झाडांच्या उगमापाशी**
**नसतात फुलांची गाणी'**

गाई, रान, झाडे, फुले या निसर्ग प्रतिमांचा वापर करुन कवीने काव्याशयाला अधिक नेमका अर्थ बहाल केला आहे.

**गंध धराया भिंगरवारा सुटला या ना या ना**
**घरकुल बांधू पुन्हा कधितरी पाऊस पडतो तान्हा**
**जाई मोगरा पळस राहू दया नसे भरवसा बाई**

**झांजरता देऊळ शिवाचे हंबरतिल ना गाई**
**चोळिबांगडी दर्पणबिंदी जसे नदीचे पाणी**
**वाहुन जाईल आज मुळाचा देठ तोडला कोणी**
**उमल जातो शिखर धुक्यातुन तोवर वितळती चंद्र**

ग्रेस यांच्या वरील कवितेतील प्रत्येक काव्य ओळीत निसर्ग प्रतिमा येते, वारा, पाऊस, जाई, मोगरा, पळस, गाई, नदी, देठ, शिखर, धुके, चंद्र, या निसर्ग प्रतिमा कवितेला सौंदर्य बहाल करतात. ग्रेस यांच्या कवितेतील निसर्ग प्रतिमा आशयपूर्ण असतात. उदा.,

**शुभ्र बर्फ सर्व दूर गगन तेवढे मुके**
**पर्णहीन चांदण्यात वृक्ष दोन पोरके**

बर्फाचे शुभ्र असणे, गगनाचे मुके असणे, वृक्षांचे पर्णहीन असणे त्याबरोबर वृक्षांचे पोरकेही असणे या भावावस्था व निसर्ग प्रतिमा ग्रेसच्या एकाकी, उत्कट, भावविभोर मनस्थिती अधोरेखीत करतात.

**चंद्र लिंबोणीच्या मागे**
**असा गुंतला साजणी**
**चिरेबंदी वाडयामध्ये**
**शिरे किरणाचे पाणी**
♦♦♦
**मोर आशाठाच्या काठी**
**कथा ऐकायास आला**
**त्याचा सारंग पिसारा**
**वारा घेऊन पळाला**
♦♦♦

फुल व फुलांच्या अनेक प्रतिमा ग्रेस यांच्या कवितेत दिसून येतात. उदा.,
**झाड वाढता वाढता त्याने होऊ नये फूल**
♦♦♦
**तुझे सोडविन केस त्याचा बांधीन आंबाडा**
**देह झडल्या हातांनी वर ठेवीन केवडा**
♦♦♦
**घर राखील तयाचे**
**ओवी मागचा केवडा**
♦♦♦
**लालभडक सुर्याचा**
**माझ्या समोर पळस**
♦♦♦
**कोणीनाही अंगणात**
**कोणी नाही आले गेले**
**फक्त झाडांच्या रुपाने**
**इथे टाकतो मी फुले**
♦♦♦
**मला हात नाही जसा बाभळींना**

**नसाव्या फुलांच्या कधी ओंजळी**
**दिठीच्या तळातील कारुण्य माझे**
**जळे देह त्याची गळे सावली**

वाऱ्याची प्रतिमा ही ग्रेसच्या कवितेत अनेकदा येते वाऱ्याची प्रतिमा ग्रेसच्या कवितेत महत्वपुर्ण भूमिका निभावताना दिसते उदा.

**शब्दांने उठले पक्षी**
**अन दूर पळाला वारा**
**पाण्याच्या हदय तळाशी**
**मग येवून बसल्या तारा**
♦♦♦
**केरळी चंदनी वारा**
**तू सांग एवढे साधे**
**मोगरी चांदणे टिचले**
**कि तुझ्या बिलवरी राधे**

ग्रेस यांच्या कवितेतील निसर्ग प्रोदशिक मर्यादेत अडकून बसत नाही. विमुक्त भानाची व्यापकता घेवून तो ग्रेस यांच्या भावजीवनात आणि कवितेत अनेक रंग भरतो.

ग्रेस यांच्या कवितेतील निसर्ग अमूर्तरुपात येतो. त्यामुळे निसर्गघटकाचे ग्रेस व्यक्तिकरण करतात. निसर्गातील घटकांना विशिष्टतेपेक्षा सामान्यरुपात व्यक्त करणारी ग्रेसची कविता अधिक अर्थपूर्ण वाटते. उदा. ग्रेस यांच्या कवितेतील संध्याकाळ दुःखासारखी उदास असते. निसर्गघटकांच्या व्यक्तिकरणाचे सुंदर उदाहरण म्हणजे 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या काव्यसंग्रहातील 'झाडे' ही कविता.

ग्रेस यांच्या कवितेतील निसर्गाला जशा प्रदेशिकतेच्या मर्यादा नाहीत तशाच कालिक मर्यादाही नाहीत. हा निसर्ग स्थलकालनिरपेक्ष आहे.

**'फुलांची नावे,**
**मला कधीही आठवत नसतात**
**वनवासात संपलेले दिवस**
**कुठेही भेटत असतात**
**जी गोष्ट फुलांची तीच झाडांची आणि पक्षांची'**

ग्रेस निसर्ग प्रतिमांचा वापर करत गूढता, उदासी, एकाकीपण, निःशब्दता, दुःख, आभास, व्याकुळता या विविध भावभावनांचा अविष्कार करतात. निसर्ग प्रतिमांना ग्रेस आपल्या संवेदनशील व्यक्तित्त्वाचा अर्थ देतात. या कारणामुळे ग्रेसची शब्द रचना अनवट होते. ग्रेसच्या काव्यभाषेत निसर्गाला अनन्यसाधारण महत्व आहे. ग्रेससाठी निसर्ग प्रतिमा हा एंद्रिय संवेदनांचा प्रगटीकरण करणारा महत्वाचा घटक आहे. काव्याशी सुसंगत असा या प्रतिमेचा वापर केल्यामुळे कवितेचा रुपबंध, अर्थस्तर उंचावत जातो. ग्रेस यांच्या कवितेच्या संरचनेत सुर्य, बर्फ, घर, शिल्प, कावळा, चंद्र, घोडे या प्रतिमा प्रतिकांची सतत पुनरावृत्ती होते. धुके, शिल्प, कावळे, घोडे, घारी, मड, शिवालय, चर्च, बर्फ, पहाड, चंद्र, या निसर्ग प्रतिमांनी ग्रेसच्या कवितेला आशय संपन्न केले आहे. ग्रेसच्या कवितेतील घोडे निर्मितीच्या उर्जेशी संबंधीत असतात. ग्रेसच्या कवितेतील घारी मरणाच्या आकस्मात झेपेशी संबंधीत असतात. मठ, शिवायल, चर्च, घंटा हे पुरातनातून अस्तित्त्वात उरलेले प्राक्तन या संदर्भातून येते. अशा प्रतिमा प्रतीकाच्या वापरातून काव्याशयाची जटीलता, अनेकार्थसूचकता, दुर्बोधता, व्यामिश्रता वाढते व कवितेला अर्थाची उंची प्राप्त होते.

**'माझ्या श्रावण नभांत**
**रुप सावळे सावळे**
**आणि मेघांच्या राऊळी**
**टाळ मृदुंग नांदले!**
**आता फिटेल हळद**
**उन्ह झेपेल कायेला**
**मेंदीभरल्या हातांचा**
**विठू असेल भूकेला!'**

ग्रेस यांनी नभ, मेघ, उन्ह, मेंदी, माती, फुल, सावली, या निसर्ग प्रतिमांचा मुक्त अविष्कार करत मीलनोत्सुक भाववृत्तीचे नृत्यनाटय अभिव्यक्त केले आहे. ग्रेस यांच्या कवितेतील नभ मातृत्वाशी सबंधीत आहेत. आईच्या कुशीतला सावळा तान्हुला येथे वात्सल्य भावात चिंब न्हावून निघत आहे. ग्रेस वात्सल्य आणि शुंगार या भावनांची दुहेरी वीण निसर्ग प्रतिमांच्या आधारे विनतात. त्यामुळे कवितेला आशय संपन्नता प्राप्त होत असल्याचे दिसून येते. निसर्ग प्रतिमांच्या वापरातून ग्रेस आपल्या अनवट व तरल भाषिक संवेदनेने कवितेला अर्थपूर्ण व सौंदर्ययुक्त परिभाषा देतात. निसर्ग प्रतिमांच्या या गुढ वापरामुळे ग्रेस यांच्या कवितेचे अनुभव विश्व व्यामिश्र होते. अशा निसर्ग प्रतिमांच्या वापरामुळे गूढता, उदासी,एकाकीपण, निःशब्दता, दुःख, आभास, व्याकुळता, हया विविध भावछटा कवितेला आशयाच्या उंचीवरती नेतात. अशाप्रकारे ग्रेस यांच्या कवितेत निसर्ग प्रतिमांना महत्वाचे स्थान आहे.

## निष्कर्ष :–

1. वारा, पाऊस, जाई, मोगरा, पळस गाई, नदी, देठ, शिखर, धुके, चंद्र, कावळे, चिमण्या, घार, मोर हे पक्षी, मोगरा, गुलाब,कमळ, बकूळ, चाफा ही फुले, चाफा बाभूळ हे वृक्ष, घोडे, हरीण हे निसर्गातील घटक ग्रेसच्या कवितेत दिसून येतात.
2. ग्रेस यांचा कवितेतील निसर्ग प्रोदशिक मर्यादेत अडकून बसत नाही. विमुक्त भानाची व्यापकता घेवून तो ग्रेस यांच्या भावजीवनात आणि कवितेत अनेक रंग भरतो
3. निसर्ग प्रतिमांचा वापर करुन ग्रेसने काव्याशयाला अधिक नेमका अर्थ बहाल केल्याचे दिसून येते.
4. ग्रेस यांच्या कवितेतील निसर्ग अमूर्तरुपात येतो. त्यामुळे निसर्गघटकाचे ग्रेस व्यक्तिकरण करतात. निसर्गातील घटकांना विशिष्टतेपेक्षा सामान्यरुपात व्यक्त करणारी ग्रेसची कविता अधिक अर्थपूर्ण वाटते.
5. ग्रेस यांच्या कवितेतील निसर्गाला जशा प्रादेशिकतेच्या मर्यादा नाहीत तशाच कालिका मर्यादाही नाहीत.
6. ग्रेससाठी निसर्ग प्रतिमा हा एंद्रिय संवेदनांचा प्रगटीकरण करणारा महत्वाचा घटक आहे. काव्याशी सुसंगत असा या प्रतिमेचा वापर केल्यामुळे कवितेचा रुपबंध, अर्थस्तर उंचावत जातो.
7. ग्रेसच्या कवितेतील घोडे निर्मितीच्या उर्जेशी संबंधीत असतात. ग्रेसच्या कवितेतील घारी मरणाच्या आकस्मात झेपेशी संबंधीत असतात. मठ, शिवायल, चर्च, घंटा हे पुरातनातून अस्तित्त्वात उरलेले प्राक्तन या संदर्भातून येते. अशा प्रतिमा प्रतीकाच्या वापरातून काव्याशयाची जटीलता, अनेकार्थसूचकता, दुर्बोधता, व्यामिश्रता वाढते व कवितेला अर्थाची उंची प्राप्त होते.
8. निसर्ग प्रतिमांच्या वापरातून ग्रेस आपल्या अनवट व तरल भाषिक संवेदनेने कवितेला अर्थपूर्ण व सौंदर्ययुक्त परिभाषा देतात. निसर्ग प्रतिमांच्या या गुढ वापरामुळे ग्रेस यांच्या कवितेचे अनुभव विश्व व्यामिश्र होत असल्याचे दिसून येते.

## संदर्भ :–

1. डॉ. काळे अक्षयकुमार, 'ग्रेसविषयी', विजय प्रकाशन, नागपूर, 2009 पृ.19
2. जयंत परांजपे, 'ग्रेस आणि दुर्बोधता' विजय प्रकाशन, नागपूर, 2012, पृ.130
3. ग्रेस 'वाऱ्याने हालते रान', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पृ.26
4. ग्रेस, 'राजपुत्र आणि डार्लिंग, अमेय प्रकाशन, नागपूर प.आ.1973

5. ग्रेस,'संध्याकाळच्या कविता', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प.आ.1967
ग्रेस, 'चंद्रमाधवीचे प्रदेश' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प.आ.1991

LBP PUBLICATION